RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ९, अंक ३९] मंगळवार, जून ६, २०२३/ज्येष्ठ १६, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ५५

प्राधिकृत प्रकाशन

### अंतिम नगररचना परियोजना, नैना क्र. ३

**(चिपळे, कोप्रोली, विहीघर, नेरे, नेरेपाडा, मोहो)**

**जाहीर सूचना**

**[ महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम, १९७४ च्या नियम क्र. १३(९) सहित महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना नियोजन अधिनियम, १९६६ च्या कलम ७२(७) अन्वये]**

क्रमांक लवाद/नरयो -३/नैना/अंतिम/निवाडा/२०२३/८९८.— ज्याअर्थी, प्रारुप नगररचना परियोजना नैना क्र.३, (चिपळे, कोप्रोली, विहिघर, नेरे, नेरेपाडा, मोहो) ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र.क्र.१०३/ १७/नवि-१३, दिनांक १३ सप्टेंबर २०१७ अन्वये, त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८ चे पोट- कलम ( २ ) अन्वये त्यांची अधिसूचना क्र. सिडको/नैना/ टिपीएस-३/प्रा.यो./ २०१९/१२९९/SAP/११४४, दिनांक १ नोव्हेंबर २०१९ प्रमाणे मंजुरी केली आहे. उक्त अधिसूचना ही **महाराष्ट्र शासन राजपत्रात** असाधारण, भाग-१ मधील पृष्ठ १ ते ७ वर दिनांक १ नोव्हेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध झालेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट-कलम ( १ ) अन्वये राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने निवृत्त उपसंचालक, नगररचना श्री. सु. व. सुर्वे यांची दिनांक ३० नोव्हेंबर २०१९ च्या अधिसूचना क्र. टीपीएस-१२१९/१५२४/प्र.क्र.६४/१९/ नवि-१२,अन्वये वर उल्लेखलेल्या मंजूर प्रारुप परीयोजनेसाठी लवाद म्हणून नेमणूक केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम क्र. १९७४ च्या नियम क्र. १३( १ ) अन्वये **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण, भाग-२ मध्ये दिनांक ८ जानेवारी २०२० रोजी सूचना लवाद यांनी प्रसिद्ध करून प्रारुप नगररचना परियोजना, नैना क्र.३, ( चिपळे, कोप्रोली, विहिघर, नेरे, नेरेपाडा, मोहो ) करीता लवाद म्हणून कर्तव्ये पार पाडण्याचे काम दिनांक ८ जानेवारी २०२० पासून सुरु करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, विहीत केलेल्या नमुना क्रमांक ४ मधील विशेष सूचना उक्त नगररचना परियोजनेमध्ये समाविष्ट झालेल्या सर्व जमीन मालकांना देण्यात आलेल्या असून त्यांची या संदर्भातील सुनावणी पुर्ण करून त्याबाबतची टिपणे नोंदविण्यात आलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट-कलम ( ३ ) अन्वये नगररचना परीयोजना, नैना क्र.३ , (चिपळे, कोप्रोली, विहिघर, नेरे, नेरेपाडा, मोहो ) ची सदर लवाद यांनी त्यांच्या दिनांक ११ फेब्रुवारी २०२२ च्या लवाद, नरयो-३/उपविभागणी/२०२२/५६९ च्या सूचनेप्रमाणे प्रारंभिक परीयोजना व अंतिम परीयोजना अशी विभागणी दिनांक ११ फेब्रुवारी २०२२ रोजी केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमांमधील नियम क्र. १३ प्रमाणे सर्व कार्यवाही पूर्ण करून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट-कलम ( ४ ) व ( ६ ) मधील कर्तव्ये पार पाडण्यात आलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, त्यानंतर लवाद यांनी प्रारंभिक नगररचना परियोजना नैना क्र. ३ तयार करून शासनास विहीत मुदतीत सादर केली होती व उक्त प्रारंभिक नगररचना परियोजना शासनाने दिनांक २९ नोव्हेंबर २०२२ च्या अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२२/२१८६/ प्र.क्र.१५१/२२/न.वि-१२ अन्वये उक्त अधिनियमांच्या कलम ८६(१) अन्वये मंजूर केली आहे.

त्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार या योजनेचे लवाद म्हणून उक्त अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोट-कलम (७) प्रमाणे तसेच उक्त नियमांच्या नियम क्र. १३(९) प्रमाणे असे जाहीर करीत आहेत की, आता अंतिम नगररचना परियोजना नैना क्र.३, ( चिपळे, कोप्रोली, विहिघर, नेरे, नेरेपाडा, मोहो ) ही ३१ मे २०२३ रोजी विहीत मुदतीत तयार करण्यात आली आहे.

ही अंतिम परियोजना निम्नस्वाक्षरीकार लवाद यांच्याकडून तयार करण्यात आल्यानंतर जनतेच्या तसेच या परियोजनेमध्ये समाविष्ट झालेल्या जमिनींच्या मालकांच्या अवलोकनार्थ लवादांच्या व नैनाच्या कार्यालयात कामकाजाच्या वेळेत नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच या तयार करण्यात आलेल्या अंतिम नगररचना परीयोजनेतील तपशील सर्व जमीन मालकांना योग्य वेळी नमुना क्र. ५ प्रमाणे कळविण्यात येणार आहे.

**सु. व. सुर्वे,**
लवाद,
नगररचना परियोजना, नैना-३,
(चिपळे,कोप्रोली,विहीघर,नेरे,नेरेपाडा,मोहो).

**पत्ता.**—नैना कार्यालय, टॉवर नं. १०,
आठवा मजला,बेलापूर रेल्वे स्टेशन,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
दिनांक ३१ मे २०२३.

## FINAL TOWN PLANNING SCHEME, NAINA No. 3

(Chipale, Koproli, Vihighar, Nere, Nerepada, Moho)

*PUBLIC NOTICE*

**[Under Section 72(7) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966]**
**[read with Rule 13(9) of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974]**

No. TPS-ARB/TPS-3/NAINA/Final/Award/2023/898.— Whereas, the Draft Town Planning Scheme, NAINA No. 3 (Chipale, Koproli, Vihighar, Nere, Nerepada, Moho) (hereinafter referred to as "the said Draft Scheme") has been sanctioned by the Vice Chairman and Managing Director, CIDCO under sub-section (*2*) of section 68 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter, referred to as the 'said Act') *vide* Notification No. CIDCO/NAINA/TPS-3/Draft Scheme/2019/1299/SAP/1144, dated 1st November, 2019, in exercise of the powers delegated to him by the Urban Development Department *vide* Notification No.TPS-1817/973/CR-103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification is published in *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part-II, dated 3rd May 2019 ;

And whereas, the Government in Urban Development Department has appointed Shri S. V. Surve, Retired Deputy Director of Town Planning as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme *vide* Notification No. TPS-1219/1524/ CR-64/19/UD-12, dated 30th November 2019 under sub-section (*1*) of section 72 of the said Act ;

And whereas, the Arbitrator, in accordance with Rule No.13 (1) of Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974 (hereinafter referred to as the 'said Rules'), has declared under his notice dated 8th January, 2020 that, he has commenced the duties as Arbitrator in respect of the Town Planning Scheme, NAINA No. 3 (Chipale, Koproli, Vihighar, Nere, Nerepada, Moho) with effect from 8th January, 2020 ;

And whereas, the special notices in prescribed Form No. 4 have been served to each and every owner of the lands included in the said scheme & the hearings in this regard have been completed ;

And whereas, the Town Planning Scheme, NAINA No.3 (Chipale, Koproli, Vihighar, Nere, Nerepada, Moho) has been sub-divided by the Arbitrator under his notice bearing No. Arbitrator/ TPS-3/Sub-division/2022/569, dated 11th February, 2022 into Preliminary Scheme & Final Scheme on 11th February 2022 as provided under sub-section (*3*) of section 72 of the said Act ;

And whereas, the Arbitrator has now followed the procedure prescribed in Rule No. 13 of the said Rules, and has carried out the duties laid down in sub-sections (*4*) & (*6*) of section 72 of the said Act ;

And whereas, thereafter, the Arbitrator has prepared the Preliminary Town Planning Scheme, NAINA No. 3 and submitted the said scheme to the Government within the prescribed time limit and the said Preliminary Town Planning Scheme has been sanctioned *vide* Notification dated 29th November, 2022 bearing No. TPS-1222/2186/CR-151/22/UD- 12 under section 86(*1*) of the said Act.

Now, therefore, the undersigned as Arbitrator hereby declares that the Final Town Planning Scheme, NAINA No. 3 (Chipale, Koproli, Vihighar, Nere, Nerepada, Moho) has been drawn up by him on 31st May, 2023 as provided under sub-section (*7*) of section 72 of the said Act read with rule 13 (9) of the said Rules within the prescribed time limit.

The Final Scheme so drawn up by the undersigned has been published and copies thereof have been kept open for the inspection of the land owners and of the public during office hours at the office of the Arbitrator and of the Special Planning Authority, NAINA, at 7th Floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD, Belapur, Navi Mumbai. The details of the said Final Town Planning Scheme would be communicated to all the land owners in Form No. 5 in due course.

Place : NAINA, 7th Floor, Tower No. 10,
CBD-Belapur 400 614,
dated 31st May, 2023.

S. V. SURVE,
Arbitrator,
Town Planning Scheme, NAINA No. 3.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.